नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 05/01/2022 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या इसमांवर दंडात्मक कार्यवाही

दिनांक 04/01/2022 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलिस स्टेशन खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली की, मिलन चौक चनकापुर येथे अवैधरितीने रेतीचा साठवणुक असून जेसीबी द्वारे रेती टिप्पर मध्ये भरले जात आहे. अशी माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मौजा मिलन चौक चनकापुर येथील मंडपे ले–आउट येथे छापा घतला असता, एमएच–40/पी– 3375 कमांकाची जेसीबी मध्ये इसम क्र. 1) संकेत सुरेश कोल्हे, रा. पारडी व 2) रिहान रिजवानं शेख रा. दहेगाव जेसिबी चे सहायाने टिप्पर मध्ये रेती भरतांना मिळून आले. तसेच सदर ठिकाणी अंदाजे 60 ब्रास कि. 1,80,000/– रुपयेचा रेती चा अवैद्य साठा मिळून आला. यावरून सदर स्टॉक बाबत व दोन्ही वाहनावर दंडात्मक कारवाई करिता मा. तहसीलदार सावनेर यांना हस्तांतरित करण्यात आले. दोन्ही वाहने 1) जेसीबी पिवळ्या रंगाचा किंमत 10,00,000/–रू. 2) टिपर क्र. एमएच– 40/वाय– 6388 किमती 12,00,000/–रू. 3) 4 ब्रास रेती किमती 12,000/–रू. असा एकुण कि. 22,12000 /–रू. चा मुद्देमाल मिळून आला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे आदेशाने सपोनि स.पो.नी. अनिल राऊत, पो.हवा. ज्ञानेश्वर राऊत, पो.हवा. अरविंद भगत, पोना शैलेश यादव, वीरेंद्र नरड, चासफौ साहेबराव बहाले यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर